Vol-13 Special Issue- 1.3 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# झाडीपट्टी लोकरंगभूमीवरील 'अत्याचार' नाटक आणि वसुधैव कुटुंबकम

**वैदेही चवरे**
ललित कला विभाग, रा.तु.म.ना.वि. नागपूर
**डॉ. संयुक्ता थोरात**
विभाग प्रमुख
ललित कला विभाग, रा.तु.म.ना.वि. नागपूर

## सारांश

लोकपरंपरेचा वारसा जोपासत अनेक लोककला प्रकारांनी मराठी रंगभूमी समृद्ध होत गेली. केवळ मनोरंजनच नव्हे तर मनोरंजनातून लोकप्रबोधन हे ब्रीद जोपासत लोकरंगभूमीची यशस्वी वाटचाल सुरू आहे. लोकरंगभूमीवरील नाट्यप्रयोगाचे सादरीकरण हे प्रेक्षक सापेक्ष असल्याने लोकजीवनाचे दर्शन त्यातून घडून येत असते. 'वसुधैव कुटुंबकम' या संकल्पनेला आधारभूत धरूनच ही वाटचाल अविरतपणे सुरू आहे. विदर्भामध्ये सादर होणाऱ्या लोकनाट्य प्रकारांमध्ये झाडीपट्टी नाटक हे प्रामुख्याने झाडीपट्टी भागात म्हणजेच भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या भागामध्ये सादर होताना दिसून येते. या शोधाच्या माध्यमातून झाडीपट्टी रंगभूमीवर सादर होणाऱ्या 'अत्याचार' या नाटकातील 'वसुधैव कुटुंबकम' संकल्पनेतील मूल्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. विदर्भातील लोक रंगभूमीवर सादर होणाऱ्या नाटकातील कथानक, संवाद, पात्र व सादरीकरण यांच्या माध्यमातून मानवी एकात्मता, करुणा, समता व सहअस्तित्वाचा मेळ कसा साधला जातो याचे अध्ययन करण्यात आले आहे. 'वसुधैव कुटुंबकम' या संकल्पनेची उत्तम अभिव्यक्ती हे धनंजय ढवळे लिखित झाडीपट्टी रंगभूमीवरील 'अत्याचार' नाटक आहे.

**Keywords -** झाडीपट्टी, लोकरंगभूमी, नाटक

**प्रस्तावना –** आद्य रंगाचार्य यांच्यानुसार 'लोकनाट्य' या शब्दाची व्याख्या अशी आहे, "लोकांनी लोकांसाठी जी रंगभूमी निर्माण केली ते लोकनाट्य होय."[1] खऱ्या अर्थाने लोकनाट्याची सुरुवात ही ग्रामीण भागातून झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. प्राचीन लोक जीवनातूनच लोककला विकसित झाल्या, तर लोककलांमधूनच लोकजीवन घडले असेही म्हणता येईल. विदर्भातील झाडीपट्टी लोकरंगभूमी ग्रामीण भागातील जनतेच्या जीवनातील संघर्ष प्रभावीपणे मांडणारी रंगभूमी आहे. मनोरंजन समाज जागृती सोबतच मानवी मूल्यांची रुजवण हा देखील झाडीपट्टी नाटकांचा मुख्यउद्देश असतो. झाडांनी आच्छादित असा प्रदेश म्हणून झाडीपट्टी असे या प्रदेशाला संबोधण्यात येते. कापणी झाल्यानंतर शेतांमध्ये एक सर्वसाधारण रंगमंच तयार करण्यात येतो. ज्याच्या समोर लोक चटई किंवा चादर टाकून नाटकाचा आनंद घेतात. पाच तास किंवा त्यापेक्षा जास्त नाटकाची प्रस्तुती होते. रात्री सुरू होणारे नाटक पहाटे समाप्त होते. नाटक सहसा तीन अंकी असते. ज्यात लावणी सादरीकरण आणि विशिष्ट पात्रांच्या माध्यमातून विनोद निर्मिती करण्यात येते. विविध विषयांना हाताळत झाडीपट्टी लोकरंगभूमीवरील नाटक हे रसिक प्रेक्षकांमध्ये जीवन मूल्यांना रुजवण्याचे, एकता निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण असे कार्य करीत असते

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**संशोधन पद्धती –** सदर शोध निबंधाकरीता गुणात्मक संशोधन पद्धती वापरण्यात आली आहे. झाडीपट्टी लोकरंगभूमीवर सादर होणाऱ्या 'धनंजय ढवळे' लिखित 'अत्याचार' या नाटकाच्या कथानकाचे विश्लेषण, पात्रांचा अभ्यास तसेच नाट्य सादरीकरणाचे निरीक्षण करण्यात आले. अध्ययनाकरीता काही ग्रंथ, संशोधन निबंधांचा उपयोग करण्यात आलेला आहे.

चर्चा – नाटकातील पात्रे : स्त्री पात्रे – सविता - नाटकाची मुख्य नायिका, गरीब कुटुंबातील स्त्री, आनंद आमलेची पत्नी.

लक्ष्मी - गरीब कुटुंबातील कन्या, रहीम शेखची बहीण.

नंदिनी - श्रीमंत कुटुंबातील कन्या, नागनाथ नागेश्वरची बहिण.

सुगंधा - नर्तकी

पुरुष पात्रे -आबा आमले - नाटकातील मुख्य शेतकरी पात्र. कर्ज न फेडल्याने नागनाथ नागेश्वर विष पाजून त्याची हत्या करतो.

आनंद आमले - आबा आमले चा मोठा मुलगा. कारखान्यात कामगार.

अभय आमले - आबा आमलेचा लहान मुलगा.

नागनाथ नागेश्वर - श्रीमंत बिझनेस मॅन, नाटकातील खलनायक.

प्रलय नागेश्वर - श्रीमंत इसम, नागनाथ नागेश्वरचा लहान भाऊ.

रहीम शेख - कारखाना कामगार, आनंद आमलेचा मित्र.

पोपटलाल पोटदुखे - बाग रखवालदार .

दुःखमंजन - दंतमंजन विक्रेता, विनोदी पात्र.

नाटकातील पात्रे विविध वर्गातील असल्यामुळे एकाच नाटकात समाजातील विविध वृत्तीच्या लोकांचे दर्शन घडते.

**नाटकाचे कथानक -** अंथरुणावर पडूनही सुखाचे स्वप्न बघणाऱ्या आशावादी शेतकरी कामगाराच्या आयुष्यावर आधारित हे नाटक असून शेतकऱ्यांवर होणारे अत्याचार,पिळवणूक व शोषण या नाटकाच्या माध्यमातून दिसून येते. नाटकाच्या पहिल्या अंकातच सुरुवातीला नाटकाच्या नायकाच्या वडिलांचा खून करण्यात येतो. खाजगीकरणामुळे कंपनीमधून काढून टाकल्या नंतर नाटकाचा नायक आनंद रोजगाराकरीता शेती करण्याचा मार्ग निवडतो. दुःखमंजन, पोपटलाल आणि सुगंधा या पात्राच्या माध्यमातून नाटकामध्ये विनोद निर्मिती करण्यात आलेली आहे. नाटकाच्या पहिल्या अंकातच रहीमची बहीण लक्ष्मीवर नागनाथद्वारे अत्याचार होतो. शेतातील धान्याच्या गंजीला आग लागते ती विझविण्याकरिता आनंद आगेत उडी घेतो त्यात तो दिव्यांग होतो. नाटकाच्या दुसरा अंकाची सुरुवात नंदिनी आणि पोपटलाल यांच्या संवादातून होते सविता, नागनाथ कडे रोजगारासाठी विनवणी करायला येते तेव्हा, नागनाथ तिच्या पोटावर लाथ मारून तिच्या गर्भातील बाळाचा जीव घेतो. सुगंधा आणि दुःख मंजन च्या माध्यमातून काही दृश्यांमध्ये विनोद निर्माण करण्यात आलेला आहे. नागनाथ नागेश्वर कोण आहे हे अभयने नंदिनीला सांगितल्यानंतर दोघांमध्ये वाद होतात नंदिनी निघून जाते. दरम्यान लक्ष्मीचे लग्न नागनाथ नागेश्वरच्या लहान भावाशी म्हणजेच प्रलय नागेश्वर सोबत करण्यात येते. कॅन्सर मुळे रहीमचा मृत्यू होतो. लक्ष्मीला सासरी गेल्यानंतर प्रलयची सत्यता कळते. त्याच दरम्यान नागनाथ नागेश्वर तिच्या गर्भातील बाळाचा जीव घेतो. इथेच नाटकाचा दुसरा अंक संपतो. नाटकाच्या तिसऱ्या अंकात अभय आमले सब इन्स्पेक्टर बनतो. तो सविता आणि आनंद यांना पत्र पाठवतो. दरम्यान सविता आणि आनंद यांना कळतं की, अभयला त्याच्या शिक्षणाकरिता रहीम पैसे पाठवत असतो. नंदिनी परीक्षेकरिता बाहेरगावी निघून जाते तेव्हा नागनाथ आनंद आमलेचा खून करतो. अभय परत आल्यानंतर त्याला ही सत्यता कळते आणि तो प्रण घेतो की, भावाला न्याय मिळवून देईल. तो प्रलयला अटक करतो. नागनाथ नागेश्वरला देखील अटक करणार तेवढ्यात सविता नागनाथ नागेश्वर चा खून करते. नाटकाच्या शेवटी नंदिनीला सत्यता कळते. ती अभय आणि सविताची माफी मागते. सविता, नंदिनीला माफ करून तिचा स्वीकार करण्याचा सल्ला अभयला देते. तिथेच नाटकाचा शेवट होतो. नाटकातील विविध संवादांच्या माध्यमातून 'वसुधैव कुटुंबकम' या संकल्पनेची जाणीव होते. नाटकातील पहिल्या अंकात रहिम आनंदला म्हणतो,

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

"न्याय और हक्क के लिये लढना पडता है, हमे अन्याय की खिलाफ आवाज उठानी होगी|"[2] या वाक्यामधून न्याय आणि हक्कांविषयीची जाणीव तसेच एकतेचा भाव दिसून येतो. नाटकात आनंद जेव्हा म्हणतो, "आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराच्या विरोधात संपूर्ण देश जर पेटून उठेल तरच इथल्या प्रत्येकाला न्याय मिळू शकेल."[3] या वाक्यातून सामाजिक एकत्रीकरण व ऐक्याची भावना दिसून येते. नाटकात आनंद सविताला म्हणतो, "आपल्यावर आलेल्या परिस्थितीत धावून येणारा कुणी देव होता ना, तर तो देव होता, माणसामधला रहीम."[4] या वाक्यातून आनंद आणि रहीम या दोन भिन्न धर्मामधील व्यक्तींची मैत्री, रहीमने आनंदसाठी सोसलेले कष्ट आणि मानवतावादी दृष्टिकोन स्पष्ट होतो. नाटकाच्या शेवटी सविता अभयला म्हणते, "थांबा भाऊजी. केवळ त्यांची बहीण आहे म्हणून तिच्या प्रेमाला ठोकर मारत आहात तुम्ही ? नाही भाऊजी. रावणाने केलेल्या पापाची शिक्षा बीबीसणास का म्हणून? तुम्ही हिचा तिरस्कार न करता हिच्या प्रेमाचा तुम्ही स्वीकार करावा, हीच माझी विनंती आहे तुम्हाला."[5] या वाक्यातून सवितेच्या मनातील माणुसकी, दयाभाव, करूणा हे गुण दिसून येतात. नाटकात बोलीभाषेतून संवाद साधला गेल्या असल्याने आपल्या लोकसंस्कृतीचा वारसा जपत पात्र थेट प्रेक्षकांशी संवाद साधतात. व्यक्ती ते समाज असे स्वरूप निर्माण झाल्याने त्यास व्यापक रूप प्राप्त होते. नाटकाच्या शेवटी नंदिनी आणि अभय एकत्र आल्याने श्रीमंत-गरीब दरी दूर होऊन वर्णभेद नाहीसा करण्यात येतो. जो 'वसुधैव कुटुंबकम'ची संकल्पना स्पष्ट करतो.

**नाटकाचे सादरीकरण –** नाटक सादर करण्याकरिता रंगमंच हा बरेचदा शेतामध्ये उंचवटा निर्माण करून उभारलेला असतो. कापणी झाल्यानंतरच्या काळात अशा प्रकारे सादरीकरण या रंगमंचावर करण्यात येते. त्यामुळे पर्यावरणाला हानी पोहोचणार नाही याची काळजी घेऊन प्रयोग करण्यात येतो. पर्यावरणाविषयी असलेली सजगता यातून दिसून येते. सादरीकरणाचा प्रदेश जरी विदर्भ असला तरी विदर्भातील केवळ एकाच ठिकाणी सादरीकरण न होता विविध गावांमध्ये प्रयोग सादर करण्यात येतात. एक कलावंत किंवा समूह विविध ठिकाणी प्रयोग सादर करतो. दरम्यान प्रादेशिक बंधनं झुगारून एक पाऊल पुढे टाकण्यात येते. नाटकाला येणारा प्रेक्षक हा विविध जातींचा, धर्माचा किंवा वर्गाचा असतो. सर्व प्रेक्षक एकत्र येऊन नाटकाचा आनंद घेतात. विविध गावातील मंडळी एका गावात एकत्र येऊन नाटक बघतात. यातून सामाजिक एकत्रीकरण व सामाजिक ऐक्याची भावना निर्माण होते. नाटक बघत असताना प्रेक्षकांच्या भावनांचे विरेचन घडून येते. ते पात्राशी एकरूप होऊन नाटक बघत असतात. त्यामुळे सविता किंवा लक्ष्मी वर होणारा अत्याचार हा त्यांना आपल्यावर होणारा अत्याचार वाटतो. नायक शेतकरी असल्यामुळे ग्रामीण विभागातील मंडळी नायकाच्या पात्रासोबत भावनिक दृष्ट्या अधिक जवळ येतात. ज्यातून नायक हा वेगळा व्यक्ती नसून जणू आपणच नायक आहोत ही भावना त्यांच्यामध्ये निर्माण होते. यातून नाटकातली पात्रे आपलीच आहेत परकी नाहीत ही भावना प्रेक्षकांमध्ये निर्माण होते.

**निष्कर्ष -** नाटकाच्या विविध संवादातून वेळोवेळी निदर्शनास येणारी मानवी मूल्ये, करुणा, सहिष्णुता, दयाभाव, सामाजिक ऐक्य, एकात्मता, सहवेदना या भावनांमधून हे संपूर्ण एक कुटुंब आहे असे वाटणे हीच 'वसुधैव कुटुंबकम' संकल्पनेची लोकनाट्यात्मक अभिव्यक्ती आहे. त्यामुळे झाडीपट्टी लोकरंगभूमीवरील 'अत्याचार' हे नाटक 'वसुधैव कुटुंबकम' या संकल्पनेशी एकरूपता साधते.

## संदर्भसूची

डॉ. पु.मा. काळभूत, 'लोकनाट्य - उद्गम आणि विकास', विजय प्रकाशन, नागपूर 1997, पृष्ठ 3

धनंजय ढवळे, 'अत्याचार' नाट्यसंहिता, पृष्ठ 8

धनंजय ढवळे, 'अत्याचार' नाट्यसंहिता, पृष्ठ 48

धनंजय ढवळे, 'अत्याचार' नाट्यसंहिता, पृष्ठ 62